RNI No. MAHBIL/2009/35529

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ३५] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २८-सप्टेंबर ३, २०२५/भाद्रपद ६-१२, शके १९४७ [पृष्ठे २० किंमत रुपये : १४.००

### प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक न्या.अ./५६६२/२०२५.— श्रीमती एस. के. टोनपे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेण यांची दिनांक २८ जुलै २०२५ ते दिनांक ३१ जुलै २०२५ रोजीची चार दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक २७ जुलै २०२५ रोजीचे रविवार सुट्टीस जोडून तसेच दिनांक २७ जुलै २०२५ ते दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एस. के. टोनपे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेण म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एस. के. टोनपे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेण या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्रीमती एस. के. टोनपे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे होता.

**राजेंद्र द. सावंत,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ७ ऑगस्ट २०२५.

## जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

## अधिसूचना

क्रमांक न्या.अ./५६६३/२०२५.— श्रीमती एम. बी. अत्तार, मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांचा दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजीची तीन दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक ८ ऑगस्ट २०२५, दिनांक ९ ऑगस्ट २०२५ व दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजीचे नारळीपौणिमा, दुसरा शनिवार, रविवार सुट्टीस जोडून तसेच दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एम. बी. अत्तार, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड-अलिबाग म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एम. बी. अत्तार, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड-अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

श्रीमती एम. बी. अत्तार, ह्या अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्रीमती ए. एच. ठाकूर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग यांचेकडे राहील.

दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. डी. एम. झाटे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग यांचेकडे राहील.

**राजेंद्र द. सावंत,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ७ ऑगस्ट २०२५.

---

## जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

## अधिसूचना

क्रमांक न्या.अ./५६६४/२०२५.— श्री. ए. ए. शिंदे, सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग यांची दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते दिनांक १४ ऑगस्ट २०२५ अशी एकूण ४ दिवसांची अर्जित रजा मागील दिनांक ८ ऑगस्ट २०२५, दिनांक ९ ऑगस्ट २०२५ व दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजीची नारळीपौर्णिमा सुट्टी व दुसरा शनिवार, रविवार सुट्टी व पुढील दिनांक १५ ऑगस्ट २०२५ दिनांक १६ ऑगस्ट २०२५ व दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजीचे स्वातंत्र दिन, गोपाळकाळा व रविवार सुट्टीस जोडून तसेच दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपासून ते दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह तसेच दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या स्वतंत्र दिन ध्वजवंदनाच्या कार्यक्रमांस हजर असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. ए. ए. शिंदे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग म्हणून पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. ए. ए. शिंदे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. ए. ए. शिंदे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

**राजेंद्र द. सावंत,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ७ ऑगस्ट २०२५.

## सहायक संचालक, नगररचना, सिंधुदुर्ग शाखा कार्यालय, सिंधुदुर्ग यांजकडून

### सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक आस्था/जाहीर सूचना कलम २०(३)/ससंनरसिं/९९४.—ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) नुसार, महाराष्ट्र राज्यातील विविध प्रदेशांसाठी प्रादेशिक योजना मंजूर केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१ कक) (ग) व २० (४) मधील तरतुदींनुसार शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१८/प्र.क्र.-२३६/१८/डिपी व आरपी/कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर, २०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली महाराष्ट्र राज्याकरिता (काही अपवाद वगळता) मंजूर केली असून, दिनांक ३ डिसेंबर, २०२० पासून अमलात आलेली आहे व ती प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू आहे (यापुढे " उक्त नियमावली " असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, सदर नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदींनुसार महानगरपालिकेच्या हद्दीपासून २ कि.मी., नगरपरिषदेच्या हद्दीपासून १ कि.मी. आणि नगरपंचायतीच्या हद्दीपासून ०.५० कि.मी. अंतरातील प्रादेशिक योजनेचे क्षेत्रामध्ये, जिथे प्रादेशिक योजनेत झोन नकाशे तयार केलेले आहेत किंवा तयार केलेले नाहीत, अशा क्षेत्रांसाठी योग्य रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे तयार करणेचे आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदीनुसार प्रादेशिक योजना क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) चे तरतुदीनुसारची कार्यवाही पूर्ण करणेकरिता शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक टीपीएस-१८२०/६१४/प्र.क्र. ७९/२०२१/नवि-१३, दिनांक २७ मार्च, २०२५ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम १५४ चे तरतुदीनुसार दिलेल्या शासन निदेशान्वये संबंधीत जिल्ह्याचे सहायक संचालक, नगररचना, शाखा कार्यालय यांना अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले आहे.

आणि त्याअर्थी, आता, सदर सूचनेशी संलग्न " परिशिष्ट -अ " नुसारच्या उक्त परिघस्त क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळयांच्या नकाशांचे प्रसिद्धीकरण करणे व त्यानुषंगाने ३० दिवसांचे विहित मुदतीत नागरिकांच्या प्राप्त सूचना व हरकती यावर सुनावणी घेणे आवश्यक असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) च्या तरतुदीन्वये सदरहू सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

उक्त प्रारूप रस्त्यांच्या जाळयांच्या नकाशांच्या अनुषंगाने नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सहायक संचालक, नगररचना, सिंधुदुर्ग शाखा, सिंधुदुर्ग कार्यालयाकडे लेखी स्वरूपात पाठवाव्यात, सदरची सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत सहायक संचालक, नगररचना, सिंधुदुर्ग शाखा, सिंधुदुर्ग या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सूचना /हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे नागरिकांच्या अवलोकनार्थ सहायक संचालक, नगररचना, सिंधुदुर्ग शाखा, सिंधुदुर्ग या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. उक्त प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे व तपशील योग्य शुल्क आकारून सहायक संचालक, नगररचना, सिंधुदुर्ग शाखा, सिंधुदुर्ग या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**परिशिष्ट - अ**

| अ.क्र. | परिघस्त क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे | स्तंभ ‘ब’ मधील महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या हद्दीपासूनचे अंतर | परिघस्त क्षेत्रामध्ये समाविष्ट गावे |
|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) |
| १ | सावंतवाडी नगरपरिषद | १.०० कि.मी. | कोलगांव (भा.), निरुखे (भा.), भोम (भा.), कारिवडे (भा.), चराठे (भा.), माजगांव (भा.), ब्राम्हणपाट (भा.) |
| २ | देवगड-जामसंडे नगरपंचायत | ०.५० कि.मी. | मिठमुंबरी (भा.), कुणकेश्वर (भा.), इळये (भा.), पाटथर (भा.), दाभोळे (भा.), कालवी (भा.) |
| ३ | कणकवली नगरपंचायत | ०.५० कि.मी. | कलमठ (भा.), जानवली (भा.), आशिये (भा.), वागदे (भा.), हळवल (भा.), हरकुळबुद्रुक (भा.), नागवे (भा.) |
| ४ | मालवण नगरपरिषद | १.०० कि.मी. | कोळंब (भा.), घुमडे (भा.), न्हिवे (भा.), कुंभारमाठ (भा.), वायरी (भा.) |
| ५ | कसई-दोडामार्ग नगरपंचायत | ०.५० कि.मी. | मणेरी (भा.), आंबेली (भा.), गिरोडे (भा.), वझरे (भा.), आंबडगाव (भा.) |
| ६ | वाभवे-वैभववाडी नगरपंचायत | ०.५० कि.मी. | सोनाळी (भा.), एडगांव (भा.), सांगुळवाडी (भा.), मोहितेवाडी (भा.), टेंबेवाडी (भा.), नारकरवाडी (भा.), खांबळवाडी (भा.) |
| ७ | कुडाळ नगरपंचायत | ०.५० कि.मी. | कविलगाव (भा.), नेहरुनगर (भा.), बांबुळी तर्फ हवेली (भा.), बोरभाट (भा.), बेलनदी (भा.), आंबडपाल (भा.), मुळदे (भा.), गुढीपूर (भा.), पिंगुळी (भा.), गोंधळपूर (भा.), माणकादेवी (भा.), तुळसुली तर्फ माणगाव (भा.) |
| ८ | वेंगुर्ला नगरपरिषद | १.०० कि.मी. | नवाबाग (भा.), उभादांडा (भा.), वाघेश्वर (भा.), नमस (भा.), परबवाडा (भा.), भेंडमळा (भा.), अणसूर (भा.), तुळस (भा.), मठ (भा.), सतये (भा.), खानोली (भा.), दाभोली (भा.), सिध्दार्थवाडी (भा.) |

**स्मि. आ. कलकुटकी,**
प्राधिकृत अधिकारी तथा,
सहायक संचालक, नगररचना,
सिंधुदुर्ग शाखा, सिंधुदुर्ग.

सिंधुदुर्ग,
दिनांक १४ ऑगस्ट, २०२५.

## ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING, SINDHUDURG

### Notice

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

क्रमांक आस्था/जाहीर सूचना कलम २०(३)/ससंनरसिं/९९४.—Whereas, the State Government has been sanctioned the Regional Plans for various Regions in Maharashtra State as per the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “ the said Act ”) ;

And whereas, the Unified Development Control and Promotion Regulations for Maharashtra State (with some exceptions) has been sanctioned under the provisions of Section 37 (*1AA*) (*c*) and 20 (*4*) of the said Act, by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1818/CR-236/18/DP and RP/Sec.37 (*1AA*)(c) and 20(*4*)/UD-13, dated 2nd December, 2020 and came into force with effect from dated 3rd December, 2020 and it is applicable for the area under Regional Plans (hereinafter referred to as “ the said Regulations ”) ;

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of the said Regulations, the areas in Regional Plan within a belt of 2 k.m. from the boundaries of Municipal Corporation, 1 k.m. from the boundaries of Municipal Council and 0.50 k.m. from the boundaries of Nagar panchayat, where zone plans are prepared or not prepared, appropriate Road Network Plans to be prepared for such areas ;

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of the said Regulations, the Government in Urban Development Department *vide* Government Order No. TPS-1820/614/C.R.-79/2021/UD-13, dated 27th March, 2025, has been delegated the powers as per the provisions of Section 154 of the said Act to the respective Assistant Director of Town Planning, Branch Office, of the Concerned District, in order to carry out the process under the provisions of Section 20 (*3*) of the said Act regarding the draft Road Network Plans for the areas within the Regional Plan area.

and therefore, now, it is necessary to publish the draft Road Network Plans in the said area as per “ Schedule-A ” attached to the said Notice, to hear the suggestions and objections from the public within the prescribed period of 30 days, therefore, the said Notice is being published in the *Maharashtra Government Gazette* under the provisions of Section 20 (*3*) of the said Act ;

If any person have any suggestions / objections in accordance with the draft Road Network Plans, they should send these suggestions/objections in writing to the office of the Assistant Director of Town Planning, Sindhudurg Branch, Sindhudurg, within the period of 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestions / objections received by the office of Assistant Director, Town Planning, (Sindhudurg Branch, Sindhudurg, within 30 days from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette* will be considered ;

The draft Road Network Plans are available for the public inspection during office hours at the office of the Assistant Director, Town Planning, Sindhudurg Branch, Sindhudurg. The copies of the said draft Road Network Plans and its particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Assistant Director of Town Planning, Sindhudurg Branch, Sindhudurg.

*Schedule - A*

| Sr. No. | Draft Road Network Plan in fringe area | Distance from boundary of Municipal Corporation/ Municipal Council/ Nagarpanchayat mentioned in column 'B' | Villages included in fringe area |
|---|---|---|---|
| (A) | (B) | (C) | (D) |
| 1 | Sawantwadi Nagarparishad | 1.00 k.m. | Kolgaon (P.), Nirukhe (P.), Bhom (P.), Kariwade (P.), Charathe (P.), Majgaon (P.), Bramhanpat (P.) |
| 2 | Devgod-Jamsande Nagarpanchayat | 0.50 k.m. | Mithamumbari (P.), Kunkeshwar (P.), Elaye (P.), Patathar (P.), Dabhole (P.), Kalavi (P.) |
| 3 | Kankavli Nagarpanchayat | 0.50 k.m. | Kalmath (P.), Janavli (P.), Ashiye (P.), Vagade (P.), Halval (P.), Harkaulbudruk (P.), Nagve (P.) |
| 4 | Malvan Nagarparishad | 1.00 k.m. | Kolamb (P.), Ghumade (P.), Nhive (P.), Kumbharmath (P.), Vayari (P.), |
| 5 | Kasai-Dodamarg Nagarpanchayat | 0.50 k.m. | Maneri (P.), Aambeli (P.), Girode (P.), Vazare (P.), Aambadgaon (P.) |
| 6 | Vabhave-Vaibavwadi Nagarpanchayat | 0.50 k.m. | Sonali (P.), Yedgaon (P.), Sangulwadi (P.), Mohitewadi (P.), Temwadi (P.), Narkarwadi (P.), Khambalwadi (P.) |
| 7 | Kudal Nagarpanchayat | 0.50 k.m. | Kavilgaon (P.), Neharunagar (P.), Bambuli Tarf Haveli (P.), Borbhat (P.), Belnadi (P.), Aambadpal (P.), Mulde (P.), Gudhipur (P.), Pinguli (P.), Gondhalpur (P.), Manakadevi (P.), Tulasuli Tarf Mangaon (P.) |
| 8 | Vengurla Nagarparishad | 1.00 k.m. | Navabag (P.), Ubhadanda (P.), Vagheshwar (P.), Namas (P.), Parabwada (P.), Bhendamala (P.), Ansur (P.), Tulas (P.), Math (P.), Sataye (P.), Khanoli (P.), Dabholi (P.), Siddharthwadi (P.) |

S. A. KALKUTAKI,
Assistant Director of Town Planning,
Sindhudurg Branch, Sindhudurg.

Sindhudurg,
Dated 14th August, 2025.

## उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी यांजकडून

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक/एसआर/१३९४/२०२२/वांझोळे बुद्रुक.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/ प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचनेनुसार एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे ; अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करणेत येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-३ मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-५ मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या (कलम ११) च्या पोट-कलम ४अ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अ नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रत्नागिरी यांना पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची—एक

### जमिनीचे वर्णन

### मौजे वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

### लघु पाटबंधारे योजना वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्र./सर्व्हे नं./ हिस्सा नं. | अंदाजित क्षेत्र (हे. आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | १०/२७ पै | १.९१.०० |
| २ | १०/३६ | ०.५३.०० |
| ३ | १३/१ पै | ०.६४.०० |
| ४ | १३/२१ पै | ०.३०.३० |
| ५ | १३/२६ पै | ०.०३.५० |
| ६ | १३/२७ पै | ०.०३.०० |
| ७ | १३/२८ पै | ०.०६.०० |
| ८ | १३/२९ पै | ०.०८.६० |
| ९ | १३/३० | ०.७३.०० |
| १० | १३/३१ | ०.७०.०० |
| ११ | १३/३२ | ०.५२.०० |
| १२ | १३/३३ | ०.८६.०० |
| १३ | २०/१४ पै | ०.०९.२० |
| १४ | २०/१५ पै | ०.००.२५ |
| १५ | २०/२३ पै | ०.३६.६० |
| १६ | २०/२६ | ०.९९.०० |
| १७ | २५/१ पै | ०.३१.०० |
| १८ | २५/२ पै | ०.५८.०० |
| १९ | २५/३ पै | ०.१९.१० |
| २० | २५/५ पै | ०.०२.१० |
| २१ | ३७/१ पै | १.४८.०० |
| २२ | ३७/२ | १.१७.०० |
| २३ | ३७/३ | ०.६९.०० |
| २४ | ३७/४ पै | १.४२.०० |
| २५ | ३७/५ | ०.४०.६० |
| | **एकूण** | **१४.१२.२५** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | - | लघु पाटबंधारे योजना वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील सी. मुख्य कामे अतंर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** | - | मौजे वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनासाठी सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | - | लघु पाटबंधारे योजनेच्या प्रकल्पामुळे सिंचनाचा फायदा होणार असून सार्वजनिक हितासाठी शेतीचा विकास होईल. |

## अनुसूची-तीन

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | - | लघु पाटबंधारे योजना वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यां योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही. म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

## अनुसूची-चार

### सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

क्रमांक SIA/२१२/२०२४, दिनांक २३ ऑगस्ट २०२४ मौजे वांझोळे बुद्रुक, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या जमिनीचे भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्ट्या कोणताही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाही. आम्ही सामाजिक निर्धारण पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे. या प्रकल्पाने गावाला अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होणार असून शेतीचा विकास होईल.

## अनुसूची-पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटुंबे नाहीत. त्यामुळे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी प्रशासक नेमणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**टीप**.—उक्त जमिनीच्या नकाशाचे उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी, यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक २१ जुलै २०२५.

**जीवन देसाई,**
उप विभागीय अधिकारी,
रत्नागिरी.

## उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी यांजकडून

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक/एसआर/१३९५/२०२२/वांझोळे (सनगलेवाडी).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/ प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ च्या अधिसूचनेनुसार एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची–एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे ; अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करणेत येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-३ मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-५ मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या (कलम ११) च्या पोट-कलम ४अ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अ नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रत्नागिरी, यांना पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची—एक

## जमिनीचे वर्णन

### मौजे वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**लघु पाटबंधारे योजना वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्र./सर्व्हे नं./ हिस्सा नं. | अंदाजित क्षेत्र (हे. आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ७६/४ पै | ०.१६.७५ |
| २ | ७६/५ पै | ०.२१.०० |
| ३ | ७६/६ पै | ०.४०.०० |
| ४ | ७६/७ | ०.५५.०० |
| ५ | ७६/८ | ०.३०.०० |
| ६ | ७६/१० पै | ०.२२.०० |
| ७ | ७७/१ पै | ०.०५.०० |
| ८ | ७७/२ | १.८०.०० |
| ९ | ७७/३ | २.८०.०० |
| १० | ७७/६ पै | ०.२५.५० |
| ११ | ७७/७ | ०.५७.०० |
| १२ | ७७/८ | ०.४२.०० |
| १३ | ७७/९ | ०.६९.०० |
| १४ | ७७/१० | १.६६.०० |
| १५ | ७७/११ पै | ०.२२.७५ |
| १६ | ७७/१२ | ०.०९.०० |
| १७ | ७७/१३ | ०.१०.०० |
| | **एकूण** | **१०.५१.००** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** - लघु पाटबंधारे योजना वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील सी. मुख्य कामे अतंर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

**प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** - मौजे वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनासाठी सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

**समाजाला मिळणारे लाभ** - लघु पाटबंधारे योजनेच्या प्रकल्पामुळे सिंचनाचा फायदा होणार असून सार्वजनिक हितासाठी शेतीचा विकास होईल.

**अनुसूची-तीन**

| | |
|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास - भाग पाडणारी कारणे** | लघु पाटबंधारे योजना वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही. म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

**अनुसूची-चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

क्रमांक SIA/२११/२०२४, दिनांक २३ ऑगस्ट २०२४ मौजे वांझोळे (सनगलेवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेशपुच्छ कालवा विमोचक व पोहोच रस्ता या जमिनीचे भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्ट्या कोणताही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाही. आम्ही सामाजिक निर्धारण पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे. या प्रकल्पाने गावाला अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होणार असून शेतीचा विकास होईल.

**अनुसूची-पाच**

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटुंबे नाहीत. त्यामुळे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी प्रशासक नेमणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**टीप**.—उक्त जमिनीच्या नकाशाचे उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक २१ जुलै, २०२५.

**जीवन देसाई,**
उप विभागीय अधिकारी,
रत्नागिरी.

## उप विभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एसआर/४९५/२०२२/भोवडे (तिटवली).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११/२०१४/ प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचनेनुसार एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे ; अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करणेत येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-३ मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची ५ मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या (कलम ११) च्या पोट-कलम ४अ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही :

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अ नुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी, यांना पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

**मौजे भोवडे (तिटवली), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी**

**लघु पाटबंधारे योजना, भोवडे (तिटवली), या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरणतळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन**

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्र./सर्व्हे नं./ हिस्सा नं. (२) | अंदाजित क्षेत्र (हे. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| १ | ९/० | ०१४.४० |
| २ | ६७/६ पै | ०.०४.०० |
| ३ | ६७/९ पै | ०.०९.०० |
| ४ | ६७/१० पै | ०.९६.०० |
| ५ | ६७/११ | १.५२.०० |
| ६ | ६७/१२ | ०.२६.०० |
| ७ | ६७/१३ पै | ०.८०.०० |
| ८ | ६७/१७ पै | ०.३०.०० |
| ९ | ६७/१८ पै | १.०१.०० |
| १० | ६८/१ पै | ०.०६.०० |
| ११ | ६८/४ पै | ०.०७.०० |
| १२ | ६८/५ पै | ०.५२.०० |
| १३ | ६८/६ पै | ०.२२.०० |
| १४ | ६८/७ पै | ०.०१.०० |
| १५ | ६८/१६ पै | १.८३.०० |
| १६ | ६८/१७ पै | ०.७२.०० |
| १७ | ६८/१८ पै | ०.०१.०० |
| १८ | ६८/१९ पै | ०.४३.०० |
| १९ | ६८/२०/१ पै | ०.५७.०० |
| २० | ६८/०२/२ पै | ०.२४.०० |
| २१ | ६८/२१ पै | ०.०४.०० |
| २२ | ६८/२४ पै | ०.१६.०० |
| २३ | ६९/२/१ पै | ०.११.०० |
| २४ | ६९/२/२ पै | ०.५०.०० |
| २५ | ६९/२ ब | १.४७.०० |
| २६ | ६९/३ पै | ०.०६.०० |
| २७ | ६९/१/१ पै | ४.२४.०० |
| २८ | ६९/१/२ | ०.१६.०० |
| २९ | ७२/३ पै | ०.०९.०० |
| ३० | ७२/४ पै | ०.०५.०० |

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्र./सर्व्हे नं./ हिस्सा नं. (२) | अंदाजित क्षेत्र (हे. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| ३१ | ७२/५ पै | १.००.०० |
| ३२ | ७२/६ पै | ०.०२.०० |
| ३३ | ७३/१ | ०.६५.०० |
| ३४ | ७३/२ | ०.१६.०० |
| ३५ | ७३/३ | ०.१६.०० |
| ३६ | ७३/४ | ०.२४.०० |
| ३७ | ७३/५ | ०.४०.०० |
| ३८ | ७३/६ | ०.२८.०० |
| ३९ | ७३/७ | ०.५३.०० |
| ४० | ७३/८ | १.२९.०० |
| ४१ | ७३/९ पै | ०.२५.०० |
| ४२ | ७३/१४ पै | १.२२.० |
| ४३ | ७३/१० पै | ०.१४.०० |
| ४४ | ७३/११ पै | ०.१०.०० |
| ४५ | ७४/१ पै | ०.८४.०० |
| ४६ | ७४/३ पै | ०.०८.०० |
| ४७ | ७५ | ०.२०.०० |
| ४८ | ६८/८ पै | ०.२७.०० |
| ४९ | ६६/१ पै | ०.२५.०० |
| ५० | ६२/२ पै | ०.०७.०० |
| ५१ | ६६/३ पै | ०.०४.०० |
| ५२ | ६६/६ पै | ०.०४.०० |
| ५३ | ६६/७ पै | ०.०४.०० |
| ५४ | ६६/८ पै | ०.०३.०० |
| ५५ | ६६/९ पै | ०.०२.०० |
| ५६ | ६६/१० पै | ०.१४.०० |
| ५७ | ६६/१४ पै | ०.०५.०० |
| ५८ | ६६/१५ पै | ०.०१.०० |
| ५९ | ६७/१५ पै | ०.१३.०० |
| ६० | ६७/१६ पै | ०.०५.०० |
| ६१ | ६७/१७ पै | ०७.०० |
| ६२ | ६८/१ पै | ०७.०० |
|  | **एकूण** | **२५.५२.४०** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | - | लघु पाटबंधारे योजना भोवडे (तिटवली), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. मौजे भोवडे (तिटवली) येथील लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ, सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** | - | भोवडे (तिटवली), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ, सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | - | लघु पाटबंधारे योजनेच्या प्रकल्पामुळे सिंचनाचा फायदा होत असून सार्वजनिक हितासाठी शेतीचा विकास होईल. |

## अनुसूची-तीन

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | - | लघु पाटबंधारे योजना, भोवडे (तिटवली), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही. म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

## अनुसूची-चार

### सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

क्रमांक SIA/२१२/२०२४, दिनांक १ एप्रिल २०२५ मौजे भोवडे (तिटवली), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी जमिनीचे भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्ट्या कोणताही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाही. आम्ही सामाजिक निर्धारण पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे. या प्रकल्पाने गावाला अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होणार असून शेतीचा विकास होईल.

## अनुसूची-पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटुंबे नाहीत. त्यामुळे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी प्रशासक नेमणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**टीप**.—उक्त जमिनीच्या नकाशाचे उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी, यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक २१ जुलै २०२५.

**जीवन देसाई,**
उप विभागीय अधिकारी,
रत्नागिरी.

## उप विभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एसआर/४९६/भोवडे २०२३ (बाईंगवाडी).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/ प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचनेनुसार एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे ; अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम-११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करणेत येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-३ मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची ५ मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या (कलम ११) च्या पोट-कलम ४अ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अ नुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रत्नागिरी, यांना पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

### मौजे भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

लघु पाटबंधारे योजना भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील या योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन.

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्र./सर्व्हे नं./ हिस्सा नं. (२) | अंदाजित क्षेत्र (हे. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| १ | ५८/७/५ पै | ०.०२.०० |
| २ | ५८/८/१ पै | ०.२७.०० |
| ३ | ५८/८/२ पै | ०.५७.०० |
| ४ | ५८/७/१० पै | ०.२७.०० |
| ५ | ४९/१ | ३.०४.०० |
| ६ | ४९/२ पै | ०.५८.०० |
| ७ | ४९/३ पै | ०.०५.०० |
| ८ | ४९/४ पै | ०.६२.०० |
| ९ | ४९/५ पै | ०.३१.०० |
| १० | ४९/१५ पै | ०.१२.०० |
| ११ | ८०/१ | ०.८५.०० |
| १२ | ८०/२/१/४/१ पै | १.०५.०० |
| १३ | ८०/३/२/२/४/२ पै | ०.९१.०० |
| १४ | ८०/६ पै | ०.१५.०० |
| १५ | ५७/३/१ अ पै | ०.०२.०० |
| १६ | ५७/३/१ ब पै | ०.१७.०० |
| १७ | ५७/३/२ अ पै | ०.१८.०० |
| १८ | ५७/३/२ ब पै | ०.८१.०० |
| १९ | ७७/४ पै | ०.२५.०० |
| २० | ७७/७ पै | ०.२२.०० |
| २१ | ७७/८ पै | १.१९.०० |
| २२ | ७७/९ पै | ०.२४.०० |
| २३ | ७७/११ पै | ०.४५.०० |
| २४ | ७७/१४ पै | १.५०.०० |
| २५ | ७७/१५ | ०.३४.०० |
| २६ | ७७/१६ पै | ०.५२.०० |
| २७ | ७७/१७ पै | ०.०४,०० |
| २८ | ७७/२० पै | ०.२३.०० |
| २९ | ५३अ/२४ पै | ०.२६.०० |
| | **एकूण** | **१५.२३.००** |

## अनुसूची दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | - | लघु पाटबंधारे योजना भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, भोवडे (बाईंगवाडी) येथील सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन** | - | भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | - | लघु पाटबंधारे योजनेच्या प्रकल्पामुळे सिंचनाचा फायदा होत असून सार्वजनिक हितासाठी शेतीचा विकास होईल. |

## अनुसूची तीन

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | - | लघु पाटबंधारे योजना भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन करण्यात येत आहे. तसेच बाधित क्षेत्रात निवासी जागेचा अंतर्भाव होत नाही. म्हणून बाधित कुटुंबाच्या विस्थापनाचा व पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

## अनुसूची चार

## सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

क्रमांक SIA/१०२/२०२५, दिनांक १ एप्रिल २०२५ मौजे भोवडे (बाईंगवाडी), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील लघु पाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा, प्रवेश पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी जमिनीचे भूसंपादन केल्याने सामाजिकदृष्ट्या कोणताही सामाजिक दुष्परिणाम दिसून येत नाही. आम्ही सामाजिक निर्धारण पथकाने केलेल्या अभ्यासाअंती बहुतांश लोकांची संमती असल्याचे आढळून आले आहे. या प्रकल्पाने गावाला अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होणार असून शेतीचा विकास होईल.

## अनुसूची पाच

भूसंपादनामुळे बाधित क्षेत्रात निवासी जागेचा समावेश नसल्याने बाधित होणारी कुटुंबे नाहीत. त्यामुळे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी प्रशासक नेमणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**टीप**.—उक्त जमिनीच्या नकाशाचे उप विभागीय अधिकारी, रत्नागिरी, यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

रत्नागिरी,
दिनांक २१ जुलै २०२५.

**जीवन देसाई,**
उप विभागीय अधिकारी,
रत्नागिरी.

**सहायक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक झोपुप्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी. ४/सन २०२५.— सहायक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचेकडून मंजूर केलेल्या उपविधिची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र, **निश्चय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस.नं. १७७९ (पार्ट), १७८० (पार्ट), १७८१ (पार्ट), आणि १७८२ (पार्ट) ऑफ व्हिलेज दहिसर, एम. व्ही. रोड, दहिसर (पूर्व), मुंबई ४०० ०६८,** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा नियम क्रमांक २४) ९(१) अन्वये **नोंदणी क्रमांक एम.यु.एम./एस.आर.ए/एच.एस.जी/टी.सी./१३६०१/सन २०२५,** दिनांक २७ जून २०२५ नुसार नोंदविण्यात आली व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी संस्था " असे करण्यात आले आहे.

**संध्या बानवकुळे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था
(पूर्व व पश्चिम उपनगरे),
झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

मुंबई,
दिनांक २७ जून २०२५.
SRA/CO/OW/२०२५/२३४७४.

---

**सहायक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक SRA/ARWS/OW/२६३८५/सन २०२५.—मा. सहायक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचेकडून मंजूर केलेल्या उपविधिची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र, **खान साहब मेंशन कमर्शियल एसआरए सहकारी प्रिमायसेस संस्था मर्यादित, संयुक्त इमारत क्र. ७, न.भू.क्र. ४१० सी/१ (पार्ट) आणि ४४६ सी/२ (पार्ट), ओशिवरा व्हिलेज, ता. अंधेरी, रिलिफ रोड, जोगेश्वरी (प.), मुंबई ४०० १०२ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा नियम क्रमांक २४) कलम ९(१) अन्वये नोंदणी क्रमांक एम.यु.एम./एस.आर.ए/जी.एन.एल./टी.सी./१३६०६/सन २०२५, दिनांक ११ जुलै २०२५** नुसार नोंदविण्यात आली व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " सर्वसाधारण संस्था " असून उप वर्गीकरण " इतर संस्था " असे करण्यात आले आहे.

**संध्या बावनकुळे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था
(पूर्व व पश्चिम उपनगरे),
झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

मुंबई,
दिनांक ११ जुलै २०२५.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक मुंम/उपनि/ससं.(मु.प.उ.)/बी-१२३९४/२०२५.—याद्वारे अधिसुचित करण्यात येते की, मोरारजी मिल म्हाडा संकुल अे विंग को.-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, वार्ड नं. ५४, पहाडी, गोरेगाव, विश्वेश्वर नगर, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३ नोंदणी क्रमांक एमयुएम/एमएचएडीए/एचएसजी/(टीसी)/१३६८२/२०२५-२०२६. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९(१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " **गृहनिर्माण संस्था** " असून उपवर्गीकरण " **भाडेकरू सहभागीदारी संस्था** " असे करण्यात आले आहे.

**बी. एस. कटरे,**
उप निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई पश्चिम उपनगरे,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

मुंबई,
दिनांक ७ जुलै २०२५.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक झोपुप्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी. ४/सन २०२४.— सहायक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचेकडून मंजूर केलेल्या उपविधिची प्रत व नोंदणी प्रमाणपत्र, एफ रेसिडेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. नं. ११८ के (पार्ट), ११८ एल (पार्ट), मौजे मालाड (पूर्व), ता. बोरीवली, रहेजा कॉम्पलेक्स, वेर्स्टन कॉम्पलेक्स जवळ, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा नियम क्रमांक २४) कलम ९(१) अन्वये नोंदणी क्रमांक एम.यु.एम./एस.आर.ए/जी.एन.एल./टी.सी./१३५७७/सन २०२५, दिनांक १९ मार्च २०२५ नुसार नोंदविण्यात आली व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण संस्था असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी संस्था " असे करण्यात आले आहे.

**संध्या बानवकुळे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था
(पूर्व व पश्चिम उपनगरे),
झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

मुंबई,
दिनांक १९ मार्च २०२५.
SRA/CO/OW/२०२५/५४५१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.